क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या आस्थापनेवरील क्रीडा मार्गदर्शकांची पदे बाह्यस्रोत यंत्रणेद्वारे (out Sourcing) भरण्यासाठी सुधारित मार्गदर्शक सूचना

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक संक्रीआ-२१०७/प्र.क्र.१९७/ भाग-१/क्रीयुसे-२
मंत्रालय विस्तार,मुंबई-४०० ०३२
दिनांक:- २३ ऑगस्ट,२०१९

<u>वाचा</u>:-१. शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक संक्रीआ-२१०७/प्र.क्र.१९७/ क्रीयुसे-२, दिनांक १५ जुलै, २०१०.
२. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक संक्रीआ-२१०७/प्र.क्र.१९७/ क्रीयुसे-२, दिनांक ०९ डिसेंबर,२०१०.
३. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक- पदनि-२०१३/प्र.क्र.११२/१३/वित्तीय सुधारणा१, दिनांक ०२ डिसेंबर,२०१३

<u>प्रस्तावना:-</u>

राज्यातील उदयोन्मुख क्रीडापटूंमधून आंतरराष्ट्रीय पदकविजेते खेळाडू घडविण्याच्या दृष्टीने योजना राबविण्यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या आस्थापनेवर १५३ क्रीडा मार्गदर्शकांची श्रेणीनिहाय पदे मानधन तत्वावर निर्माण करण्याचा निर्णय दिनांक १५ जुलै,२०१० च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे.त्यानुसार संदर्भाधीन दिनांक ०९ डिसेंबर,२०१० च्या शासन निर्णयान्वये क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या आस्थापनेवर निर्माण केलेल्या १५३ क्रीडा मार्गदर्शकांची नियुक्ती व इतर बाबी संदर्भातील नियमावली प्रसिद्ध करण्यात आलेली होती. तथापि सदर कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करावयाची झाल्यास क्रीडा मार्गदर्शकांच्या नियुक्तीस अडचणी निर्माण होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे.त्यामुळे संदर्भाधीन दिनांक ०९ डिसेंबर, २०१० च्या शासन निर्णयानुसार प्रसिद्ध करण्यात आलेली नियमावली अधिक्रमित करून सुधारित नियमावली निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राज्यातील उदयोन्मुख खेळाडूंमधून ऑलिम्पिक तसेच इतर तत्सम आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी पदक विजेते खेळाडू घडविण्याच्या कामी क्रीडा मार्गदर्शकांची अत्यंत महत्वाची भूमिका विचारात घेता, क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या आस्थापनेवर निर्माण केलेल्या १५३ मार्गदर्शकांच्या पदांपैकी ११० क्रीडा मार्गदर्शकांची पदे बाह्यस्रोत यंत्रणेद्वारे (out Sourcing) भरण्यासाठी शासन मान्यता देण्यात येत आहे.त्यासाठी सोबतच्या “परिशिष्ट-अ” मधील सुधारित नियमावलीस शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरच्या क्रीडा मार्गदर्शकांची मानधनावरील नियुक्ती करण्याकरिता येणारा खर्च "मागणी क्रमांक ई-३,२२०४-क्रीडा व युवक सेवा,१०४-क्रीडा व खेळ,(०९)-खेळाडूंना शिष्यवृत्त्या व पुरस्कार,(०९)(१४) मानधन तत्वावर खास प्रशिक्षकांची नेमणूक करणे (२२०४-५४४८) (कार्यक्रम), ३६ सहायक अनुदाने (वेतन)"या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. सदर शासन निर्णयान्वये संदर्भाधीन दिनांक ०९ डिसेंबर,२०१० चा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२३१५२२०१३३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.08.23 15:33:03 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई
२. आयुक्त,क्रीडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे
३. महालेखापाल (लेख व अनुज्ञेयता),महाराष्ट्र १/२,मुंबई/नागपूर
४. महालेखापाल (लेखा परीक्षा),महाराष्ट्र १/२,मुंबई/नागपूर
५. सर्व विभागीय क्रीडा उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा
६. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत)
७. सर्व तालुका क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत)
८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (संचालनालयामार्फत)
९. सर्व अध्यक्ष,तालुका क्रीडा संकुल समिती
१०.मा.मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे विशेष कार्य अधिकारी
११.निवड नस्ती (क्रीयुसे-२)

"परिशिष्ट -अ"

शासन निर्णय क्र.संक्रीआ-२१०७/प्र.क्र.१९७/क्रीयुसे-२,दिनांक: २१ ऑगस्ट,२०१९ चे सहपत्र

<u>मानधनावरील क्रीडा मार्गदर्शकांची नियुक्ती व इतर बाबीसंदर्भातील नियमावली</u>

नियम-१:- **शीर्षक**:- या नियमांना "मानधनावरील क्रीडा मार्गदर्शकांची नियुक्ती व इतर बाबी संदर्भातील नियमावली २०१९ " असे संबोधण्यात यावे.

नियम-२:- **उदिष्ट:-** ऑलिम्पिक तसेच तत्सम आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदक विजेते खेळाडू घडविण्याच्या दृष्टीने योजना राबविणे.

नियम-३:- **मानधन**:- सदरच्या क्रीडा मार्गदर्शकांची नियुक्ती प्रतीमहा रुपये २५०००/- या एकत्रीत मानधनावर करण्यात येईल.

नियम-४:- **शैक्षणिक अर्हता,वयोमर्यादा व क्रीडा विषयक अर्हता**

नियम-४.१:- **शैक्षणिक अर्हता-**

१. किमान इयत्ता १२ वी (एच.एस.सी) उत्तीर्ण आणि

२. संगणकाचे ज्ञान (MS-CIT).

नियम-४.२:- **वयोमर्यादा-**

क्रीडा मार्गदशक पदासाठी किमान २५ ते कमाल ५५ वर्षे.

नियम-४.३:- **क्रीडा विषयक अर्हता:-**

१. एन.आय.एस. (पदविका) **किंवा**

२. आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू (ऑलिम्पिक गेम्स्/ एशियन गेम्स्/ कॉमनवेल्थ गेम्स्/जागतिक अजिंक्यपद/जागतिक चषक/ युथ ऑलिम्पिक/अॅफ्रो-एशियन गेम्स/ युथ कॉमनवेल्थ गेम्स्/ युथ एशियन गेम्स / युवा जागतिक अजिंक्यपद स्पर्धा / जागतिक चषक (युवा) / आशियाई अजिंक्यपद स्पर्धा / आशियाई चषक / राष्ट्रकुल अजिंक्यपद स्पर्धा (वरीष्ठ गट) / साउथ एशियन गेम्स / वर्ल्ड युनिव्हरसिटी गेम्स / वर्ल्ड स्कूल गेम्स / आंतरराष्ट्रीय फेडरेशन कप (वरीष्ठ गट) / वर्ल्ड स्कूल चॅम्पियनशिप / एशियन स्कूल चॅम्पियनशिप) **किंवा**

३. अ २.क्र.वरील आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी झालेला व वरीष्ठ राष्ट्रीय स्पर्धेत किमान तीन वेळा सहभागी झालेला खेळाडू **किंवा**

४. राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार प्राप्त व्यक्ती किंवा राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त व्यक्ती **किंवा**

५. एकविध खेळाच्या आंतरराष्ट्रीय संघटनेमार्फत आयोजित त्या त्या खेळाचे १ ते ४ लेवल (प्रशिक्षक) पैकी किमान दोन लेवल पूर्ण केलेला खेळाडू **किंवा**

६. वरीष्ठ राष्ट्रीय स्पर्धेत पदक प्राप्त खेळाडू **किंवा**

७. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत पदक प्राप्त खेळाडू **किंवा**

८. पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत तीन वेळा सहभाग घेऊन किमान एका स्पर्धेत पदक प्राप्त खेळाडू **किंवा**

९. वरीष्ठ राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग व वरीष्ठ राज्य स्पर्धेत तीन वेळा सहभाग घेऊन किमान एका स्पर्धेत पदक प्राप्त केलेला खेळाडू.

वरील पैकी वरिष्ठ अर्हता प्राप्त खेळाडूस प्राधान्य देण्यात येईल.

नियम-५:- **पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या**:-

१. संबंधित खेळाचे प्रशिक्षण केंद्र विभागीय/जिल्हा क्रीडा संकुलाच्या ठिकाणी सुरु करणे व प्रशिक्षण केंद्रावर मार्गदर्शन करणे.

२. जिल्हा/विभागीय/राज्य स्तरीय शालेय/ संघटनेच्या स्पर्धांच्या ठिकाणी उपस्थित राहुन जिल्हयातील उदयोन्मुख गुणी खेळाडुंची निवड यादी तयार करणे.

३. क्रीडा प्रशिक्षण केंद्राचा खेळाडू निहाय मासिक अहवाल जिल्हा क्रीडा अधिकारी/क्रीडा व युवक सेवा संचालनालयाकडे सादर करणे.

४. संबधीत जिल्हयामध्ये क्रीडा नैपुण्य चाचण्यांचे आयोजन करणे.

५. शासनाच्या इतर क्रीडा स्पर्धा, शिबिरे व क्रीडा विषयक उपक्रमात सहकार्य करणे.

६. प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेणाऱ्या खेळाडुंचे दैनिक हजेरीपत्रक व मासिक प्रगती दर्शक अहवाल नोंदवहीत नोंद करुन ती नोंदवही संबंधीत जिल्हा क्रीडा अधिकारी यांना दरमहा सादर करणे.

७. विभाग/जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्राकरिता खरेदी करावयाच्या साहित्याबाबत संबंधित विभागीय उपसंचालक/जिल्हा क्रीडा अधिकारी यांना सहकार्य करणे.

८. जिल्हयाच्या ठिकाणच्या शाळांमधील मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक तसेच क्रीडा संघटक यांच्याशी संपर्क साधून जास्तीत जास्त खेळाडु प्रशिक्षण केंद्राचा लाभ घेतील या दृष्टीने प्रयत्न करणे.

नियम-६:- **नियुक्तीच्या अटी व शर्ती**:-

१. क्रीडा मार्गदर्शकांची पदे चार वर्षाच्या कालावधीसाठी बाह्यस्त्रोत यंत्रणेमार्फत भरण्यात येतील.त्यासाठी निविदा/EOI प्रसिद्ध करण्यात यावी.

२. कराराचा कालावधी चार वर्षाचा राहील.

३. कराराचा कालावधी चार वर्षाचा असला तरी नियुक्त क्रीडा मार्गदर्शकाच्या कामाचे मूल्यमापन त्याची नियुक्ती झालेल्या दिनांकानंतर प्रतिवर्षी करण्यात येईल.

४. मार्गदर्शकाचे कामाचे मूल्यमापन १०० गुणांच्या सूचीनुसार करण्यात येईल. ज्या क्रीडा मार्गदर्शकाचे गुणांकन ६० पेक्षा कमी होईल त्याच्या सेवा १ वर्षानंतर समाप्त करण्यात येतील. रिक्त झालेली पदे बाह्यस्त्रोत यंत्रणेमार्फत निवड करण्यात आलेल्या अर्हता प्राप्त क्रीडा मार्गदर्शकाची निवड करता येईल.

५. ६० पेक्षा जास्त गुणांकन प्राप्त करणाऱ्या क्रीडा मार्गदर्शकांच्या सेवा पुढील एक वर्षासाठी वाढविण्याचे अधिकार आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील. अशा प्रकारे क्रीडा मार्गदर्शकांच्या सेवा जास्तीत जास्त ३ वेळा वाढविता येतील.मात्र चार वर्षानंतर संबंधित क्रीडा मार्गदर्शकाच्या सेवा करार संपुष्टात आणून समाप्त करण्यात येतील.

६. पुढीलवर्षी म्हणजेच दर ४ वर्षांनी पुनःश्च निविदा काढून बाह्यस्त्रोत यंत्रणेमार्फत क्रीडा मार्गदर्शकांची निवड करण्याकरिता प्रक्रिया राबविण्यात यावी.

७. जिल्हयामधील सर्वाधिक लोकप्रिय व अधिकाधिक खेळल्या जाणाऱ्या खेळाकरिता त्या त्या जिल्हयातील स्थानिक खेळाडू उमेदवारांची नियुक्ती करण्यात येईल व क्रीडा मार्गदर्शकाचे कार्यक्षेत्र तो संपूर्ण जिल्हा राहील. तथापि,गरजेनुसार इतर जिल्ह्यांमध्ये रिक्त पदांवर त्यांच्या नियुक्तीचे अधिकार आयुक्त, क्रीडा यांना राहतील.

८. निवड झालेले क्रीडा मार्गदर्शक हे पूर्ण वेळ शासनाच्या विभागीय/जिल्हा/तालुका क्रीडा संकुलातील क्रीडा प्रशिक्षण केंद्रावर कार्यरत राहतील.

९. सदर पदाकरिता राज्य शासकीय/निमशासकीय कर्मचारी वगळून इतर अर्हता प्राप्त इतर व्यक्ती अर्ज करु शकतील.

१०. कामाचे तास निश्चित करुन देण्याचे अधिकार आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना राहतील.

११. विभागस्तरावर नियुक्त केलेल्या समिती मार्फत क्रीडा मार्गदर्शकांनी केलेल्या कामगिरीचे मुल्यांकन एक वर्षानंतर करण्यात येईल. अशा मूल्यांकना अंती ज्या क्रीडा मार्गदर्शकांची कामगिरी समाधानकारक असेल त्यांची नियुक्ती पुढे चालु ठेवण्याबाबत व ज्या क्रीडा मार्गदर्शकांची कामगिरी असमाधानकारक असेल त्यांची नियुक्ती संपुष्टात आणण्याची शिफारस समिती संचालनालयास सादर करेल.

१२. एकापेक्षा अधिक खेळात प्राविण्य मिळविलेल्या व्यक्तीस क्रीडा मार्गदर्शक म्हणून नियुक्तीसाठी प्राधान्य देण्यात यावे.

नियम-७:- **निवड प्रक्रिया** -:

आयुक्त,क्रीडा व युवक सेवा यांनी क्रीडा मार्गदर्शकांच्या मानधन तत्वावर नियुक्तीसाठी जाहीरात विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्यामार्फत वर्तमानपत्रामध्ये निविदा/EOI द्वारे प्रसिध्द करण्यात येईल. जाहिरातीनुसार प्राप्त होणाऱ्या अर्जदारांच्या अर्जांची छाननी विभागीय उपसंचालकांच्या कार्यालयामार्फत करण्यात येईल.

निवड प्रक्रीयेसाठी मुल्यांकन १०० गुणांमध्ये खालील प्रमाणे करण्यात येईल.

अ. क्र.	बाब		गुण
१	खेळ निहाय कौशल्य चाचणी (७५ गुणांची विभागणी -प्रशिक्षण कौशल्य ५० गुण, वैयक्तिक कौशल्य १५ गुण व वैयक्तिक फिटनेस १० गुण) (किमान ४० गुण आवश्यक)		**७५**
२	शैक्षणिक अर्हता		**२५**
	पदव्युत्तर पदवी	०५	
	पदवी	०५	
	इ.१२ वी	०५	
	अनुभव	०५	
	संगणकाचे ज्ञान (MS-CIT).	०५	
	एकूण गुण		**१००**

टिप १ **-:** नियम क्र. ४.३ मधील क्रीडा अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांपैकी,उपरोक्त १०० गुणांपैकी जास्तीत जास्त गुण प्राप्त करणारा उमेदवार खेळनिहाय नियुक्तीस पात्र राहिल.

नियम-७.१.:-खेळनिहाय कौशल्य चाचणीची नियमावली, अटी , शर्ती व इतर अनुषंगीक कार्यवाही इत्यादी विहित पध्दती निश्चित करण्याचा अधिकारी आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना राहील.

नियम-८:- **मूल्यमापन समितीचे गठन** :-

क्रीडा मार्गदर्शक पदावरील नियुक्तीसाठी व नियुक्ती पुढे चालु ठेवण्यासाठी खालील प्रमाणे निवड समिती गठित करण्यात येत आहे. क्रीडा मार्गदर्शकांच्या नियुक्तीनंतर एक वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यावर त्यांच्या क्रीडा कामगिरीचे मूल्यमापन सदर

समितीमार्फत दुसऱ्या वर्षी व त्यानंतर प्रतिवर्षी करण्यात येईल. सदर समिती खालील प्रमाणे आहे:-

१	संबंधीत विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा	अध्यक्ष
२	संबंधीत विभागातील तालुका क्रीडा अधिकारी	सदस्य
३	संबंधीत खेळाचा क्रीडा मार्गदर्शक	सदस्य
४	महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेने नियुक्त केलेला प्रतिनिधी / राज्य, राष्ट्रीय पुरस्कारार्थी/ आंतरराष्ट्रीय खेळाडु	सदस्य
५	जिल्हा क्रीडा अधिकारी	सदस्य सचिव

टिप-: वरील अ.क्र. २ व ३ येथील सदस्यांची नियुक्ती संबंधित विभागीय उपसंचालक करतील. अ.क्र.४ येथील सदस्याची नियुक्ती महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशनद्वारे करण्यात आली नसल्यास सदर सदस्याची नियुक्ती संबंधित विभागीय उपसंचालक करतील.याबाबत काही तक्रारी असल्यास आयुक्त,क्रीडा यांनी सुनावणी घ्यावी.आयुक्त,क्रीडा व युवक सेवा यांचा निर्णय अंतिम राहील.

नियम-९:- **क्रीडा मार्गदर्शकांच्या मुल्यांकनाचे निकष**-

क्रीडा मार्गदर्शकांच्या तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्तीचा एक वर्षाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर त्या क्रीडा मार्गदर्शकांच्या कामगिरीचे मूल्यांकन करण्याकरिता निकष खालील प्रमाणे आहेत:-

१. संबंधित क्रीडा मार्गदर्शक ज्या क्रीडा प्रकाराचे प्रशिक्षण देत असेल त्या क्रीडा प्रकारातील खेळाडूंनी वर्षभरात केलेल्या विविध स्तरावरील क्रीडा कामगिरीच्या आधारे त्या क्रीडा मार्गदर्शकाला गुण देण्यात यावेत. या गुणांच्या आधारे त्या क्रीडा मार्गदर्शकाची सेवा पुढील वर्षाकरिता कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात येईल.

२. क्रीडा मार्गदर्शकांना, त्यांनी घडविलेल्या खेळाडूंच्या विविध स्तरावरील क्रीडा स्पर्धेतील कामगिरीकरिता पुढील प्रमाणे गुण देण्यात येतील:-

अ.क्र.	स्पर्धेचा स्तर	प्रती खेळाडू सहभागाकरिता गुण	प्रती खेळाडू प्राविण्याकरिता गुण
१	जिल्हा स्तर	२	३
२	विभागीय स्तर	५	३
३	राज्य स्तर	१०	३
४	राष्ट्रीय स्तर	१५	३
५	आंतरराष्ट्रीय स्तर	२०	३

३. सांघिक खेळाकरिता क्रीडा मार्गदर्शकाने वर्षभरात किमान ५० गुण संपादित करणे आवश्यक राहील.

४. वैयक्तिक खेळाकरिता क्रीडा मार्गदर्शकाने वर्षभरात किमान ३० गुण संपादित करणे आवश्यक राहील.

५. किमान गुण संपादित न करणाऱ्या क्रीडा मार्गदर्शकाची नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल .

६. क्रीडा मार्गदर्शकांच्या मूल्यांकनासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयातील क्रीडा प्रशिक्षण कक्षाने दरमहा सर्व क्रीडा मार्गदर्शकांकडे प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची यादी तयार करावी.

७. क्रीडा मार्गदर्शकांचे मुल्यांकन हे क्रीडा व युवक सेवा संचालनालयातील क्रीडा प्रशिक्षण कक्षाकडुन जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या मार्फत प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे करण्यात येईल.

नियम-१०:- **नियम शिथिल करणे/बदल करणे -**

या नियमावली मधील कोणताही नियम शिथिल करणे, त्यात अंशत: बदल करणे किंवा तो पुर्ण पणे रद्द करणे आणि नवीन नियम समाविष्ट करणे याबाबतचे सर्व अधिकार शासनास राहतील.

नियम-११:- सदरच्या क्रीडा मार्गदर्शकांच्या नियुक्त्या खालील नमूद खेळांसाठी अनुज्ञेय असतील -

१.मैदानी, २.जलतरण, ३.सायकलींग, ४.हॉकी, ५.फुटबॉल, ६.टेबल टेनिस, ७.बॅडमिंटन, ८.व्हॉलीबॉल, ९.बास्केटबॉल, १०.हॅण्डबॉल, ११.आर्चरी, १२.जिम्नॅस्टिक, १३.बॉक्सींग, १४. कुस्ती, १५.वेटलिफ्टींग, १६. शुटींग, १७.ज्युदो, १८.कबड्डी, १९. खो-खो, २०.तायक्वाँदो, २१.मल्लखांब, २२.तलवारबाजी, २३.लॉनटेनिस.

नियम-१२:- **जिल्हा निहाय संख्या-**

१. प्रत्येक विभाग स्तरावरील मुख्यालयाच्या ठिकाणी प्रत्येकी ३ व पुणे क्रीडा प्रबोधिनीसाठी २ असे एकुण २६ क्रीडा मार्गदर्शक.

२. विभाग स्तरीय मुख्यालय वगळता उर्वरीत २८ जिल्हयांसाठी प्रत्येकी ३ प्रमाणे एकुण ८४ क्रीडा मार्गदर्शक.

अपरिहार्य व निकडीच्या परिस्थितीत जिल्हा/विभाग स्तरावरील संख्येत बदल करण्याचा अधिकार शासनास राहील.

****